**पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड**
**स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ, प्रेमलोक पार्क,**
**पिंपरी चिंचवड ४११०३३**
**दुरध्वनी क्रमांक- ०२०-२७३५०५५५**

जा.क्र.प्रलि/आस्था-२/पो.अंमलदार/सेवाज्येष्ठता/१३२९७०/२०२४, पिंपरी चिंचवड, दिनांक. 21 /03/२०२४

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.दिनांक २१ जुन २०२१ रोजीची अधिसुचना

२. महाराष्ट्र शा. सा.प्र.वि शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही२०१६/प्र.क्र२१८/कार्या-१२ दि. १३ जुलै २०२१

३. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील क्र.पोमस/६/१०/पो.शि भरती- सेवाज्येष्ठता /२५१/२०२१ दिनांक १७/०८/२०१३

४. महाराष्ट्र शासन,गृह विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब दिनांक २६ /१०/२०१७

५.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडी परिपत्रक क्र.पोमसं/६/पो.अ/आं.जि.ब.से.ज्ये /१९७/२०२३ दिनांक १८/०८/२०२३

**विषय :-सन०१/०१/२०२४ रोजीची पोलीस शिपाई संवर्गातील पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता प्रसिध्दीबाबत..**

------ ००० ------

आ दे श :-

पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड घटकाचे आस्थापनेवरील दि.३१.१२.२०२२ अखेर कार्यरत पोलीस शिपाई अंमलदारांची दि.१.१.२०२३ रोजीची पहिल्या टप्याती तात्पुरती सेवाज्येष्ठता आणि १.१.२०२३ ते ३१.१२.२०२३ रोजी नियुक्त झालेल्या पोलीस शिपाई यांची दि.१.१.२०२४ रोजीची दुसया टप्यातील तात्पुरत्या स्वरुपातील सेवाज्येष्ठता यादी (**www.pcpc.gov.in**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर सेवाज्येष्ठता सुची खालील बाबीच्या आधारे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

१. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर इतर घटकातून वर्ग झालेल्या पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता त्यांच्या नियुक्ती दिनांक नुसार लावण्यात आलेली आहे.

२. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर इतर घटकातून आंतरजिल्हा बदलीने हजर झालेल्या पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता गृह विभागाकडील दि.२६.१०.२०१७ चे शासन निर्णय आणि पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील कार्यासन क्र.६ कडील दि.१८.८.२०२३ चे परिपत्रकानुसार मध्ये नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार त्याची महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदावरील भरती दिनांक ग्राह्य धरणत येऊन,त्या दिनांकाच्या वर्षी,घटक बदली झालेल्या घटकात पोलीस शिपाई या पदावर भरती झालेल्या व त्या वर्षी सेवेज्येष्ठतेत सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पो.शि. यांचे खाली निश्चित करण्यात आलेली आहे.

३. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर अनुकंपाने भरती झालेल्या पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता त्यांच्या नियुक्ती दिनांकानुसार लावण्यात आलेली आहे.

४. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर पोलीस भरती-२०१९ व २०२१ मध्ये भरती झालेल्या पोलीस अंमलदारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.दिनांक २१ जुन २०२१ रोजीची अधिसुचना आणि पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील क्र.पोमस/६/१०/पो.शि भरती- सेवाज्येष्ठता/२५१/२०२१ दिनांक १७/०८/२०१३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियुक्ती आदेश निर्गमित झाल्यानंतर ३० दिवसात कर्तव्यावर रुजू झाल्यास त्यांना सदर भरती प्राप्त झालेल्या गुणानेक्रमांने लावण्यात आलेली आहे.

वरील नमूद केलेल्या सर्व बाबीनुसार सेवाज्येष्ठाता सुचीमधील नमुद करण्यात आलेली जन्म तारीख, भरती तारीख, सेवानिवृत्तीची तारीख, जात, जातीचा प्रवर्ग, रा,रा,पो,बल गट व इतर घटकामधून आंतरजिल्हा बदलीवर या घटकात हजर झालेली तारीख, पोलीस भरती मध्ये प्राप्त झालेल्या गुणांची तपासणी करुन इ. बाबतची माहिती संबंधित पोलीस अंमलदार यांनी खात्री करुन **१५ दिवसात** याबाबत त्यांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या संबंधीत आस्थापना लिपीक यांचेकडे खालील विहीत तक्त्यात द्याव्यात. तसेच संबंधीत आस्थापना लिपिक यांनी सेवापूस्तकातील सेवाअभिलेख व इतर तत्सम अभिलेख तपासून खालील विहित नमुन्यात हरकती व सूचना निराकरण करणेकरीता प्रमुख लिपिक आस्थापना -२ यांचेकडे एकत्रितपणे सादर करतील.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचा हुदा, ब.न. व संपुर्ण नाव | प्रसिध्द करणेत आलेल्या सेवाज्येष्ठता सुची मधील नोंद | सेवापटातील नोंदीनुसार करावयाची दुरुस्ती | दुरुस्ती/आक्षेप योग्य कि अयोग्य याबाबतचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

( **वसंत परदेशी, भापोसे** )
अपर पोलीस आयुक्त
पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड

प्रति,

१. प्रभारी अधिकारी, संगणक शाखा,पिंपरी चिंचवड प्रसिध्दीकरीता
२. सर्व संबंधित पोलीस अंमलदार (पोलीस नोटीसीअन्वये)

प्रत :- १. सर्व प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन/शाखा/ मुख्यालय, पिंपरी चिंचवड
२. सर्व संबंधित डिओ, पोलीस स्टेशन/शाखा/ मुख्यालय, पिंपरी चिंचवड
३. आस्थापना लिपीक, परिमंडळ १ ते ३ व वाहतूक/गुन्हे/विशेष शाखा/नियंत्रण कक्ष/ पोलीस मुख्यालय
४.पोलीस नोटीस प्रसिद्धीकरीता